# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६**

## जलसंपदा विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०२, मृद व जलसंधारण**<br>**रूपये:- ९०,३६,९६,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१) | १४१९ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील जन जलसंपदा विभागामध्ये अनेक वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी तसेच तांत्रिक कर्मचारी यांची पदे दीर्घकाळ रिक्त आहेत. यामुळे विदर्भ पाटबंधारे महामंडळांतर्गत भिवापूर, कुही आणि उमरेड तालुक्यांमध्ये अनेक कालवे, कॅनॉल यांचे कामे वेळेत पूर्ण होत नाहीत आणि शेतीसाठी आवश्यक पाण्याची योजना प्रभावीपणे राबवता येत नाही. विभागाने स्वतःचे निरीक्षण केले असून मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे कामांमध्ये अडथळे येत आहेत. त्यामुळे शासनाने उमरेड विधानसभा मतदारसंघातील जन जलसंपदा विभागाच्या सर्व वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि तांत्रिक पदांची तातडीने भरती करून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करावे, जेणेकरून पाणीपुरवठा आणि शेतीसंबंधी योजना वेळेत व प्रभावीपणे राबवल्या जाऊ शकतील, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७००, मोठे पाटबंधारे**<br>**रूपये:- १,१५,२७,०४,०००/-**<br>**श्री. गजानन लवटे** |
| (२) | १२२५ | १०० | अचलपूर तालुक्यातील अंजनगाव सुर्जी जवळ असलेले शहानुर धरण पावसाळ्यात पूर्णपणे भरले की, धरण भरल्यानंतर मोठ्या प्रमाणात अतिरिक्त पाण्याचा साठा नदीपात्रात सोडण्यात येते, दोन दिवस नदीला पूर राहतो. त्यानंतर नदी पूर्णपणे कोरडी पडते, या शहाणूर नदीवरील पात्रात दोन ते तीन किलोमीटरच्या अंतरावर सिमेंट बंधारे नदीपात्रात टाकल्यास प्रत्येक ठिकाणी पाणी अडवता येईल, त्याचा फायदा शेतीला होईल, शेतातील विहीर, बोर याची पाण्याची पातळी वाढेल, भूगर्भातील पाणी वाढवून शेतीला फायदा होईल, शासनाच्या पाणी आडवा पाणी जिरवा योजनेतून किंवा रोजगार हमी योजनेतून ही कामे केल्या जाऊ शकणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३) | १४४३ | १० | तेलेवाडी लघुपाटबंधारे तालुका संगमनेर जिल्हा रत्नागिरी या योजनेतील सा कव क्र. ९० मीटर व २१० मीटर येथे दोन दगडी बांधकामातील विमोचक्रे ही ४५ वर्षांपूर्वी बांधण्यात आले असून दोन्ही विमोचके पूर्णवेळ कमकुवत होऊन २००० सन २०१५- १६ मध्ये पूर्णतः कोसळले यांच्या निरीक्षण टिप्पणी विश्वास निरीक्षण टिपणीनुसार या विमोचक पाईप मधून मोठ्या प्रमाणावर गळती होत असून ही विहिरीचे बांधकाम उपायांच्या सांध्यातून होणे परंतु सा. क्र. ९० मी वरील विहीर पूर्णपणे आतील भागात कोसळल्यामुळे आतील द्वार व लोखंडी असेंबली पाईपच्या चालू करून बसविल्यामुळे विहिरीचे द्वार व कंडूक बाजूने सद्यस्थितीत १०० ते १५० मिलिमीटर सेकंड गळती सुरू असणे त्यामुळे धरणाच्या सुरक्षेला धोका निर्माण होणे व दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेणे आवश्यक असणे तसेच दुरुस्ती काम करताना या धरणातून नागरिकांना होणारा पाणीपुरवठा खंडित करू नये परंतु शासन कारवाईत करीत असलेल्या विलंब त्यामुळे व्यक्त होणार रोष करीता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७०२, लहान पाटबंधारे**<br>**रूपये:- ३९,४१,९२,०००/-** |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (४) | १४२८ | १० | ता.आरमोरी, जि.गडचिरोली येथे गाढवी नदी आहे तसेच या गाढवी नदीवर लघुसिंचन प्रकल्प सुरु करण्यात यावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ११ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) जलसंपदा विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई